# अण्णासाहेब आवटे महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन

**मंचर : पुढारी वृत्तसेवा**

मंचर (ता. आंबेगाव) येथील अण्णासाहेब आवटे महाविद्यालयाच्या विज्ञान विभागामार्फत आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन रविवार (दि.१६) ते मंगळवार (दि.१८) दरम्यान इंटरग्रेटिव्ह नॅनोटेक्नॉलॉजी परस्पेक्टीव फॉर मल्टी डिसिप्लिनरी अॅप्लीकेशन विषयावर ऑनलाइन पद्धतीने करण्यात आले आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. के. जी. कानडे यांनी दिली.

चर्चासत्रासाठी जगभरातून विविध विषयाचे शास्त्रज्ञ सहभागी होणार असून विविध विषयांचे संशोधनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

रविवारी पब्लिक लेक्चर म्हणून नवीन शैक्षणिक धोरण २०२२ या विषयावर प्रा. आर.एस. माळी जळगाव विद्यापीठाचे कुलगुरू यांचे व्याख्यान यूट्यूबवर ऑनलाइन पद्धतीने आयोजित करण्यात आले आहे. दुसरे व्याख्यान डॉ. डी. पी. अमळनेरकर यांचे आयोजित करण्यात आले आहे. सोमवारी उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्रोसर डॉ. अरविंद नातू (शास्त्रज्ञ), डॉ. व्ही. एस. शिवनकर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या समारोपाचे प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य. डॉ. मनोहर चासकर, डॉ. सतीश परदेशी, प्राचार्य डॉ. के. जी. कानडे हे असतील. चर्चासत्रासाठी अनेक संशोधनपर लेख उपलब्ध झाले असून या चर्चासत्राचे निमंत्रक म्हणून प्रो. डॉ. ए. बी.निकुंभ हे काम पाहात आहेत, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. के. जी. कानडे यांनी दिली.